करूया आरोग्य संवाद!

करुया आरोग्य संवाद!

प्रशांत खुंटे

Centre for Enquiry into Health and Allied Themes Mumbai/Pune

'जन आरोग्य संसद' या इ. स. २००० मध्ये घेतलेल्या राष्ट्रव्यापी मोहीमेचा भाग म्हणून महाराष्ट्रातील कार्यकर्त्यांसाठी 'आरोग्य संवाद कसा साधावा?' ही पुस्तिका 'जन आरोग्य संसद' साठी सेहतने प्रसिद्ध केली होती. या पुस्तिकेतील काही मुद्दे, मजकूर व गेल्या चार वर्षातील अनुभवाच्या आधारे पुढे आलेले मुद्दे याच्या आधारे 'साथी केंद्र' चे प्रशांत खुंटे यांनी या पुस्तिकेचे लिखाण केले आहे. 'साथी-केंद्र' च्या इतर सहकाऱ्यांनी त्यात निरनिराळ्या प्रकारे योगदान केले आहे.

पहिली आवृत्तीः जुलै, २००४

प्रकाशकः **सेहत**

पुणे कार्यालय
३/४ अमन ई टेरेस, प्लॉट नं. १४०,
डहाणूकर कॉलनी,
कोथरुड, पुणे - ४११ ०२९
फोन - ९१-२०-२५४५१४१३, २५४५२३२५
e-mail : cehatpun@vsnl.com

मुंबई कार्यालय
साई आश्रय, आराम सोसायटी रोड,
वाकोला, सांताक्रुज (पू)
मुंबई- ४०० ०५५
फोनः ९१-२२-२६६७३१५४, २६६७३५७१
फॅक्सः २२-२६६७३१५६
e-mail : cehat@vsnl.com

मांडणी व सजावट : शारदा महल्ले
रेखाचित्रेः श्री. चंद्रशेखर जोशी

मुद्रकः मंदार ट्रेडर्स
पुणे- ११

आरोग्य संवादातून आरोग्य सेवा सशक्त करुया!

ग्रामीण आदिवासी भागात आजही आजारपण हे कर्जबाजारीपणाचे एक प्रमुख कारण आहे. खाजगी डॉक्टरांची फी नोकरदारांनाही परवडत नाही मग मोलमजुरी करत जगणाऱ्यांनी काय करावे? म्हणूनच बहुसंख्य जनतेसाठी चांगल्या **'सरकारी आरोग्य सेवा'** हाच आशेचा किरण आहे.

पण तरीही आजकाल अनेकजण आजारी पडल्यास सरकारी दवाखान्यापेक्षा खाजगी डॉक्टर पसंत करतात. का? तर सरकारी दवाखान्यात डॉक्टर तरी नसतात किंवा असले तरी ते खाजगीतून औषधे विकत आणायला सांगतात. रुग्णांशी माणुसकीचा संवादही आरोग्य कर्मचारी करत नाहीत. (अर्थात याला अपवादही आहेत) मग उपेक्षा करणाऱ्या सरकारी दवाखान्यात का जायचे? त्यापेक्षा पैसे देऊन खाजगीत गेलेलं काय वाईट? असा विचार मूळ धरत आहे. सरकारी दवाखाना लोकांना 'आपला' वाटत नाही.

सरकारी कर्मचारी गावात अनेक सेवा देतात. पण ते येतात ते मुख्यतः कुटुंब नियोजन किंवा लसीकरणासाठी. गावात आजाऱ्यांना देता येतील एवढी औषधेही त्यांच्याजवळ नसतात. मग आजारांवर उपचारांचे काय? जर चांगले उपचार सरकारी दवाखान्यातून मिळाले तर सरकारच्या लसीकरण मोहीमाही यशस्वी व्हायला मदत होतील. एकेका आरोग्य कर्मचाऱ्यांना एवढ्या लोकसंख्येची जबाबदारी सोपवली जाते की, प्रामाणिकपणे काम केले तर सर्व गावभेटी शक्य होत नाहीत. या परिस्थितीत दुर्गम गावांना आरोग्य सेवा कशी मिळणार?

गावा-गावात आरोग्य सेवा देण्याचे वायदे होतात पण केवळ भाषणात. नोकरभरती नाही म्हणून दवाखाने नीट चालवले जात नाहीत. डॉक्टर नेमले तर ते २४ तास उपलब्ध नसतात. का? तर त्यांना निवासाची सोय नाही. ॲम्ब्युलन्स आहे तर डिझेल नाही. का? तर आर्थिक तरतुद नाही. आरोग्य सेवांवर होणारी अपुरी आर्थिक तरतुद, दुबळी राजकीय इच्छाशक्ती व गरिबांकडे दुर्लक्ष करणारी धोरणे ही आरोग्य सेवांची मूळ दुखणी आहेत.

भारतीय संविधानात निर्देशक तत्वांमध्ये (भाग ४, अनुच्छेद ४७) नागरिकांचे पोषणमान, राहणीमान उंचावणे व सार्वजनिक आरोग्य सेवा सुधारणे हे राज्याचे प्राथमिक कर्तव्य नमूद केले आहे. पण सरकारी आरोग्य सेवांना पुरेसा अर्थिक निधि पुरवायचा नाही, नोकरभरती करायची नाही मग सरकारी दवाखाने नीट चालणार कसे? पुन्हा साळसुदपणे अकार्यक्षमता हे कारण पुढे करून सरकारी दवाखाने बंद करायला किंवा खाजगी संस्थांना चालवू द्यायला सरकार मोकळे. म्हणजे गरिबांनी महागड्या खाजगी सेवा घ्याव्यात किंवा टाचा घासुन मरावे! हे थांबायला हवे. घटनेने मान्य केलेल्या आपल्या सन्मानाने जगण्याच्या मानवी हक्कावर घाला येत आहे. आपल्या हक्काच्या संरक्षणासाठी सरकारी आरोग्य सेवा टिकायला हव्यात.

आरोग्य सेवांच्या प्रश्नांबद्दल गावागावात जागृती व्हावी, सरकारी आरोग्य सेवा क्षेत्र वाचवण्यासाठी सरकारी कर्मचाऱ्यांनीही जनतेचे साथी बनून प्रयत्न करावेत. यासाठी एकमेकांशी संवाद होणे गरजेचे आहे. दवाखान्यात डॉक्टरांना मला कोणता आजार झाला, कोणते उपचार चालू आहेत हे विचारायला पेशंट लाजतात, घाबरतात. गावात आरोग्य सेवक येत असले तरी ते गावात येऊन नक्की काय करतात हे विचारण्याचे धाडस कोणी करत नाही. यामुळे लोकांना त्यांच्या कामाचे महत्व पटत नाही. यामुळे विकासयोजना म्हणजे टारगेट्स व लाभार्थींच्या आकडेवारीची कागदी घौडदौड ठरतात. हे थांबण्यासाठी सरकारी कर्मचारी व जनतेतील बिनसंवादी भिंत पाडायला हवी. आरोग्य सेवांचा टारगेटमय अवतार पालटून जनताकेंद्री रुप आणायला हवे. त्यासाठी आरोग्य यंत्रणेचा जनतेशी संवाद व्हायला हवा. जनतेला आरोग्य यंत्रणेची ओळख व्हायला हवी. हाच आरोग्य संवाद! हा आरोग्य संवाद सरकारी आरोग्य सेवा सशक्त बनवेल. म्हणूनच या! करूया आरोग्य संवाद!

दादू ची धडपड .....

गावातील उलटी जुलाबाच्या साथीवर नियंत्रणासाठी दादू या इसमाने केलेल्या धडपडीची ही हकीकत.

शेजारच्या घरातील पोराला सकाळपासून जुलाब-उलट्या होत होत्या. दादू गावातला पुढारी गडी. त्याला राहवेना. दादूच्या दुर्गम आदिवासी पाड्यात शासनाने खास पाऊसकाळ म्हणून आरोग्य पथक व डॉक्टरची नेमणूक केली आहे. हे दादूला माहीत होते. पोराला घेऊन दादू डॉक्टरकडे आला. डॉक्टर नव्हते. दार बंद मात्र डॉक्टरच्या दारात जुलाब-उलटी होणारे आणखी चार-पाच आजारी ताटकळत बसले होते. गावात पटकी ची साथ आल्याचे दादूने ओळखले.

तातडीने काय करायचे माहीत नव्हते. दादूने सरळ तालुका गाठला. तोपर्यंत दुपार झाली होती. साथीची वर्दी देण्यासाठी बीडीओंची भेट घेतली, तर त्यांनी 'लंच टाईम' संपल्यावर यायचे सुचवले. दादू तहसीलदार कार्यालयात गेला. तहसीलदारांनी दादूचे म्हणणे ऐकून त्याला पुन्हा बीडीओ ऑफिसमध्ये घेऊन आले. तेथे अजूनही शिपायाशिवाय कुणीच नव्हते. वाट पाहून शेवटी तहसीलदारांनीच प्राथमिक आरोग्य केंद्राला फोन लावला. फोन खणखणत राहिला. बहुधा दवाखान्यात कोणीच नसावे, असे समजून तालुक्याच्या कॉटेज रुग्णालयात फोन लावला गेला. कॉटेज रुग्णालयातूनही तातडीने काहीच मदतीचे आश्वासन मिळाले नाही. तहसीलदारही वैतागले व दादूला बीडीओंची वाट पहायला सांगून निघून गेले.

दादूला स्वस्थ बसवेना. समोरच्या एसटीडी बूथ मध्ये जावून त्याने सरळ जिल्ह्याला सीईओंकडे फोन केला. साथ नियंत्रण पथक तातडीने पाठवण्याचे आश्वासन मिळाले.

दादू गावात पोहोचेपर्यंत साथ नियंत्रण पथकही गावात आले होते. पण तोपर्यंत पटकीच्या साथीने दोन बळी घेतले होते.

-(जाने ०४ मध्ये जि. ठाणे ता. मोखाडा येथील 'जनसुनवाई' मध्ये मांडली गेलेली घटना)

दादूच्या गावात घडले तसे मृत्यू गावोगाव घडतात. या मृत्यूंचा जाब कोणाला विचारणार? दैवाला? गावात उपलब्ध नसणाऱ्या डॉक्टरला? बीडीओंना? प्राथमिक आरोग्य केन्द्र की कॉटेजच्या डॉक्टरांना? आपल्याला कोण दाद देईल? आपण एकटे हे कसे करणार?

हे प्रश्न असेच सोडून चालणार नाही. आरोग्याचा प्रश्न हा आपल्या जिव्हाळ्याचा प्रश्न आहे. म्हणूनच प्रत्येकाला सन्मानाने आरोग्य सेवा मिळाव्यात यासाठीचे प्रयत्न व त्यासाठी सुचलेल्या-अनुभवलेल्या काही पध्दती आपण जाणून घेणार आहोत.

एकविसाव्या शतकात आपण शिरलो आहोत. या जमान्यात आरोग्य-सेवा सर्वांना मिळायला हव्यात, तो आपल्या सर्वांचा मानवी हक्क आहे या भूमिकेतून आता अनेक संघटना, संस्था काम करत आहेत. हा आरोग्यसेवेचा हक्क घटनात्मक, कायदेशीर हक्क म्हणून मान्य केला जावा म्हणून आरोग्य-चळवळ उभारली जात आहे. या चळवळीला सुरुवात करतांना कोणत्या पध्दती मार्ग वापरले जात आहेत हे या पुस्तिकेतून समजावून घेऊया. पण त्याआधी प्राथमिक आरोग्य सेवा म्हणजे काय ते समजाऊन घेऊ.

प्राथमिक आरोग्य सेवा म्हणजे काय?

जागतिक आरोग्य संघटनेने म्हटले आहे की, केवळ आजारपण नसणे म्हणजे आरोग्य नाही. तर **शारीरिक, मानसिक व सामाजिक दृष्ट्या पूर्ण तंदुरुस्त असणे म्हणजे आरोग्य होय.**

ज्या अवस्थेत आपण सर्वजण शारीरिक दृष्ट्या तंदुरुस्त आहोत. मेंदूत कोणताही दोष नाही व समाजात कोणत्याही वाईट गोष्टी नाहीत अशी अवस्था येणार कशी? याबद्दल आरोग्याची वरिल व्याख्या काही सांगत नाही. पण तरी दूर पल्ल्याचे ध्येय म्हणून काय असायला हवे हे या व्याख्येतून पुढे येते. आरोग्य व आरोग्य सेवा हा मानवी अधिकार आहे असे निरनिराळ्या जागतिक परिषदांनी घोषित केले आहे. पैकी केवळ आरोग्याला वाहिलेला जाहीरनामा म्हणजे अल्मा अटा जाहीरनामा. १९७८ मध्ये त्या वेळच्या सोव्हिएत युनियन मध्ये अल्मा अटा या शहरात १३४ राष्ट्रांच्या अधिकृत प्रतिनिधींनी एक जागतिक आरोग्य परिषद भरवली होती. या परिषदेत २००० साली सर्वांना आरोग्य हे ध्येय जाहीर करण्यात आले. हे ध्येय गाठण्यासाठी प्राथमिक आरोग्य सेवा हा मार्ग वापरायचा ठरला.

ज्या आरोग्य सेवा सर्वांसाठी असतात व ज्यात सर्वांची भागीदारी असते. ज्यांचा खर्च संपूर्ण समाज व देश उचलत असतो. आरोग्यासोबतच शिक्षण, पोषण, शेती, समाजाचा विकास, पशुपालन, घरे व गावाचा विकास अशा सर्व बाबींचा विचार यामध्ये केला जातो. या सेवा प्राथमिक आरोग्य सेवा असतात. त्या मिळवताना चळवळ उभारतांना आरोग्य संवाद हे माध्यम उपयोगी पडेल. त्याची ओळख करून घेऊया.

आरोग्य संवाद म्हणजे काय?

रेशनमध्ये भेसळ असली तर तुम्ही दुकानदाराला जाब विचारू शकता. एस. टी. च्या कंडक्टरने अरेरावी केल्यास आपणही अरेला कारे उत्तर देऊ शकतो. एवढंच काय मत मागायला आलेल्या पुढाऱ्याला, 'पाच वर्षे काय केलं?' असा खडा सवाल विचारण्याची आपल्यात ताकत आहे. पण एक नागरिक म्हणून आपल्याला मिळणाऱ्या आरोग्य सेवांची हेळसांड होत असल्यास आपण काय करतो? काही नाही! दवाखान्यात आपला आवाज कमजोर पडतो. कारण आपण दवाखान्यात जातो तेच मुळी आजारी, हतबल अवस्थेत. त्यामुळे रुग्ण म्हणून आपले हक्क-सन्मान यापेक्षा उपचार महत्त्वाचे. डॉक्टरकीचा, वैद्यकीय ज्ञानाचा, आरोग्य सेवा देणाऱ्या यंत्रणेचा (खास सरकारी बाण्याचा) एक दरारा आपल्या समाजात आहे. त्यामुळे सरकारी दवाखान्यातच डॉक्टर खाजगी प्रॅक्टीस करत असतील तरी फारसे कोणी काही बोलत नाही, दवाखान्यात औषधे मिळाली नाही तर खाजगीतून विकत घेतो, गावात आरोग्य सेवा द्यायला सरकारी कर्मचारी आले नाही तरी खपवून घेतो. खरं तर सर्वांना चांगल्या आरोग्य सेवा देणे हे सरकारचे कर्तव्य आहे. देशाचे नागरिक म्हणून या सेवा मिळणे हा आपला अधिकार आहे. हे अधिकार व त्यासाठीची आपली जबाबदारी आपल्याला माहीत नसल्याने बहुतेकदा आपलेच नुकसान होते. म्हणूनच हे अधिकार-जबाबदाऱ्या जाणून घेऊन चांगल्या आरोग्य सेवा मिळवण्यासाठी गाव म्हणून आपल्याला काही संघटित प्रयत्नांची गरज आहे. संघटितपणे अशी चर्चा करणे म्हणजेच आरोग्य संवाद.

आरोग्य सेवा देणारे डॉक्टर्स, वैद्यकीय कर्मचारी, खाजगी डॉक्टर्स, त्यांच्या संघटना यांच्याशी चांगल्या आरोग्य सेवासांठी संघटितपणे जनतेने संवाद करणे म्हणजे आरोग्य संवाद.

आरोग्य संवाद कशासाठी?

- सरकारला गावच्या हिताचा आरोग्य उपक्रम राबवायचा आहे पण गावाची साथ मिळत नाही.

- अनेकदा आपल्या विकासासाठी तयार केलेल्या योजना आपला विचार न घेताच जाहीर होतात, अशावेळी आग रामेश्वरी बंब सोमेश्वरी असा प्रकार होतो.

- आपल्या भागात आरोग्य उपकेन्द्र मंजूर आहे पण जागा उपलब्ध होत नाही.

- गावाजवळ सरकारी दवाखाना आहे पण तेथे २४ तास डॉक्टर उपलब्ध नाहीत.

- दवाखान्यात रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांना विनाकारण अपमानजनक वागणूक मिळते.

- आपल्यावर उपचार करणाऱ्या डॉक्टरांनी कोणत्या शास्त्रीय पद्धतीचे शिक्षण घेतले आहे ते आपल्यावर कोणते उपचार करत आहेत हे माहीत नसल्याने अनेकदा आपली फसवणूक होते, यामुळे गंभीर परिणामही भोगावे लागतात.

- अनेकदा खाजगी डॉक्टरांकडून विनाकारण इंजेक्शन/ सलाईन देवून रुग्णांची फसवणूक होताना दिसते आपल्यालाही इंजेक्शन/ सलाईनची खरी गरज केव्हा असते हे ठाऊक नसते, त्यामुळे आपण स्वतःच अशा फसवणुकीला बळी पडतो.

या समस्यांवर आपण संघटितपणे संबधितांशी चर्चा घडवून आणल्यास काही प्रमाणात तरी मार्ग निघू शकतात. एकत्र येऊन आरोग्य सेवांबद्दलच्या समस्या सोडवण्यासाठी आरोग्य संवादाची गरज आहे.

आरोग्य संवादासाठी या पध्दती/मार्ग वापरता येतील

गावबैठक

आरोग्य कर्मचारी व गावकऱ्यांची बैठक

सरकारी दवाखान्यात आरोग्य संवाद

कॅलेंडर कार्यक्रम

खाजगी डॉक्टरांशी आरोग्य संवाद

जनसुनवाई

आरोग्य संवादासाठी गावबैठक

आजारपण ही ज्याची-त्याची व्यक्तिगत समस्या आहे असा गैरसमज आहे. आपण ज्या विहिरीचं पाणी पितो ते दूषित असेल, घराघरात कुपोषण असेल, गंभीर आजाऱ्यांना तातडीने दवाखान्यात नेता येईल असा रस्ताच गावाला नसेल, गटारांची, कचरापेटीची व्यवस्था नसल्याने घाणीचे साम्राज्य असेल व या कारणांमुळे आजारपण वाढले असेल तर या समस्या व्यक्तिगत आहेत का? अर्थातच नाही. म्हणूनच या समस्यांवर एकत्र येऊन चर्चा करणे योग्य मार्ग काढणे यासाठी आपण गावात सभा/बैठक आयोजित करू शकता.

आरोग्य हे मुळात पाणी, आहार, निवारा, आर्थिक-सामाजिक घटक इत्यादी घटकांवर अवलंबून असते. आरोग्य सेवा या अनेक घटकांपैकी एक घटक आहे. चांगल्या आरोग्य सेवा मिळण्यासाठी प्रयत्न करतानाच काही मूलभूत सेवांची मागणीही आपण करायला हवी. यातील काही घटकांबाबत ताबडतोबीने काही सुधारणा करणे शक्य आहे. अशा घटकांबाबत गावच्या बैठकीत खालील मुद्यावर चर्चा करता येईल.

आपल्या गावात - १. वर्षभर पुरेसे पाणी, विशेषतः पिण्यायोग्य शुध्द पाणी सहज मिळते का?

२. रेशन दुकानातून पुरेसे धान्य, नियमितपणे मिळते का?

३. वर्षभर जवळच्या मोठ्या गावापर्यंत वाहतुक करता येईल असा चांगला रस्ता आहे का?

४. सार्वजनिक स्वच्छता आहे का? (दलदल, पाण्याची डबकी, साचलेला कचरा इ. होऊ नये यासाठी व्यवस्था आहे का?)

५. साथीच्या आजारांवर नियंत्रण आहे का? (गेल्या तीन वर्षात गावात कधी जुलाब, हिवताप, गोवर, कावीळ या आजारांची साथ आली होती का?)

वरील चर्चेतून आपल्या गावातील आरोग्य समस्यांचे ढोबळ स्वरूप आपल्याला समजू शकेल. त्याआधारे समस्या सोडवण्यासाठी सर्वांना मिळून व प्रत्येकाला काय करता येणे शक्य आहे हे ठरू शकते.

- **चांगले रेशन, पिण्यासाठी शुद्ध पाणी, रहदारीसाठी रस्ता, कचरापेटी या सेवा उपलब्ध नसतील तर त्या मिळवण्यासाठी ग्रामसभेत प्रश्न उपस्थित करा.**
- **साथरोगांची वर्दी ताबडतोब प्राथमिक आरोग्य केन्द्रापर्यंत पोचवण्याची व्यवस्था निर्माण करण्याचा आग्रह धरा.**
- **गावात जन आरोग्य समिती स्थापन करा. (जन आरोग्य समिती स्थापन करण्याबद्दलचा शासकिय ठराव परिशिष्ट १ मध्ये दिला आहे.)**

आरोग्य कर्मचाऱ्यांशी आरोग्य संवाद

सरकारी आरोग्य सेवांची माहितीच नसल्याने आपण आरोग्य सेवा मिळण्यापासून वंचित राहतो. म्हणून आरोग्य कर्मचाऱ्यांशी संवाद साधून या सेवांची माहिती करून घ्यायला हवी.

आधी असं कधी झालं नव्हतं!

मु. पो. डहाणु, जि.-ठाणे, या आदिवासी भागात कष्टकरी संघटनेने पाड्यांवर अजब मिटींगा सुरू केल्या. पाड्यावर आदिवासी पोरंटोरं, बाया, दादले, म्हातारी माणसं जमुन नर्सबाई अन् आरोग्य सेवकांची भाषणं ऐकत. आता भाषणात अजब काय! तर नर्सबाईला गावात नेमून दिलेली कामे ती लोकांसमोर घडाघडा सांगते. नर्सबाई बोलायची, 'गरोदर बायांची मिटींग घेणे, जुलाब-तापावर गावात गोळ्या देणे, लसीकरण ही माझी कामं, ह्या भागातल्या पाच गावांची जबाबदारी माझ्यावर', यावर मिटींगीत एकच गलका होतो, 'नर्सबायने बायांची मिटींग कधी घेतलीच नाय', 'आरं घेणार कशी, एकटी बाय पाच गावं फिरणार कशी?' अशी चर्चा सुरु होते, नर्सबाईच्या घशात कोरड पडलेली, आपली नेमणूक लोकांच्या सेवेसाठी पण आपल्या कामाची ऊत्तरे आपण देतो अधिकाऱ्यांना! ... मलेरिया वर्करचीही हालत अशीच, लोक मात्र म्हणत होते, "नरसबाय न् आरोग्य सेवक गावात आले काय न् गेले काय, काय कळत नव्हतं, आता त्यांची कामं झाली का नाय त्याच्यात आमी लक्ष घालू. त्यांना मदत करू. एक खरं ह्याआधी हे असं कधी झालं नव्हतं!"

आरोग्य कर्मचाऱ्यांशी आपण आपल्या गावात तसेच सरकारी दवाखान्यात जाऊन आरोग्य संवाद साधू शकतो. वरीलप्रमाणे गावात आरोग्य संवाद साधण्यासाठी आपल्याला गावात मिळणाऱ्या आरोग्य सेवा व गावपातळीचे आरोग्य सेवक कोणते यांची माहिती असणे आवश्यक आहे.

आपल्याला गावात या आरोग्य सेवा मिळायला हव्यात-

सरकारचे आरोग्य-विषयक निरनिराळे कार्यक्रम आहेत. त्या सर्वांचा विचार केला तर आपल्या गावातच खालील सेवा मिळायला हव्या-

१. गरोदर स्त्रियांना भेटून त्यांना रक्तवाढीसाठी लोहाच्या गोळ्या, धनुर्वात विरोधी इंजेक्शन, सल्ला देणे. प्रशिक्षित दाईतर्फे बाळंतपण. बाळंतपणानंतर मातेची व बाळाची तपासणी, सल्ला व औषधे.

२. अंगणवाडीत बाळांना व विशेषतः कुपोषित बाळांना पूरक आहार, लोहाच्या गोळ्या. पाच वर्षाखालील बाळांना दर सहा महिन्यांनी 'अ' जीवनसत्वाचा डोस. गरोदर बायांना शेवटच्या ३ महिन्यात पूरक आहार.

३. पुरूष व स्त्री आरोग्य सेवकाकडून साध्या आजारांवर उपचार, हिवताप, क्षयरोग, कुष्ठरोग, याबद्दल रक्त, थुंकी इ. तपासणी व उपचारांसाठी पाठपुरावा.

४. आदिवासी भागांमध्ये, पावसाळ्यात पाडा स्वयंसेवकामार्फत गावातच साध्या आजारांवर उपचार व विहीरीत टी.सी.एल. पावडर टाकणे, त्याचे प्रमाण योग्य आहे ना याची तपासणी करणे.

५. शाळेत विद्यार्थ्यांची दरवर्षी आरोग्य तपासणी करणे.

महिला व पुरुष आरोग्य सेवक, प्रशिक्षित दाई, अंगणवाडी शिक्षिका हे गावपातळीवर आरोग्य सेवा देणारे अतिशय महत्वाचे आरोग्य कर्मचारी आहेत. आजार पसरु नयेत, आजारांचा प्रतिबंध करण्यासाठी हे कर्मचारी महत्वाची भूमिका बजावतात. या आरोग्य कर्मचाऱ्यांच्या जबाबदाऱ्या आपल्याला माहीत नसतात. त्यामुळे ते गावात का येतात व काय करतात याचे महत्व गावकऱ्यांना वाटत नाही. परंतु आरोग्य कर्मचाऱ्यांचा गावाला खरोखर उपयोग व्हायचा असेल तर त्यांच्या कामात गावातील लोकांनीही मदत करायला हवी. यासाठी त्यांची कामे, जबाबदाऱ्या लोकांना समजायला हव्यात.

साधारणपणे पुढील स्वरुपाची कामे गावपातळीवरील आरोग्य सेवक करीत असतात.

- परिसर स्वच्छतेचे महत्व लोकांना पटवून देणे,
- साथरोगांवर लक्ष ठेवणे,
- आजाऱ्यांची लक्षणे ओळखून गरजेनुसार त्यांना दवाखान्यात येण्याचा सल्ला देणे,
- साध्या आजारांवर उपचार करणे,
- पाण्याची तपासणी करणे,
- हिवतापावरील नियंत्रणासाठी गप्पी मासे पाणीसाठ्यात सोडणे,
- रक्ताचे नमुने घेणे,
- क्षयरोगाच्या रुग्णांना गावातच औषधे आणून देणे,
- लसीकरण,
- कुटुंब नियोजनाच्या साधनांचे वाटप,
- गरोदर महिलांशी संबधित सेवा

हे कर्मचारी देत असतात.

गावात आरोग्य सेवा देणारे सरकारी आरोग्य सेवक

आरोग्य सेविका (ANM) आरोग्य सेवक (MPW) प्रशिक्षित दाई अंगणवाडी सेविका

या कर्मचाऱ्यांकडून आपल्याला गावातच आरोग्य सेवा मिळतात.

आरोग्य सेवक गावात येतात तेव्हा खालील आजारांवर उपचार करू शकतात

वरील आजारांवरील उपचारांसोबतच आरोग्य सेवकांनी गावात आरोग्य जागृतीचे काम करणेही अपेक्षित आहे. पाड्यातील गरोदर महिलांची बैठक घेऊन त्यांना आवश्यक त्या सूचना देणे, गरोदरपणात कोणती काळजी घ्यावी हे समजावून सांगणे, हिवताप, पटकी यासारखे साथरोग पसरु नयेत म्हणून जनजागृती करणे, कुटुंब नियोजनाचे महत्व पटवून देणे, लोकांनी निर्धुर चुलींचा वापर करावा यासाठी प्रयत्न करणे याबाबत हे आरोग्य सेवक प्रयत्नशील असायला हवेत. हे सर्व प्रयत्न आपल्या चांगल्या आरोग्यासाठीच आहेत. आपण त्यांना सहकार्य करायला हवे.

आरोग्य कर्मचाऱ्यांना काही अडचणी आहेत का?

आरोग्य सेवकांकडून आपल्याला गावातच आरोग्य सेवा मिळायला हव्यात. तो आपला हक्क आहे. पण काही वेळा आरोग्य कर्मचाऱ्यांनाही या सेवा देताना अडचणी येतात. या अडचणी कोणत्या असू शकतील?

१. महिला आरोग्य कर्मचाऱ्यांना एक महिला म्हणून काही अडचणी येतात उदा. दुर्गम गावात एकटीने फिरणे.

२. वरिष्ठांचा किंवा शासकीय धोरणांचा दोष असला तरी काही वेळा लोकांचा रोष मात्र कनिष्ठ कर्मचाऱ्यांना सहन करावा लागतो.

३. या कर्मचाऱ्यांनाही काही कौटुंबिक समस्या, जबाबदाऱ्या असू शकतात.

या आरोग्य सेवकांच्या समस्या समजावून घेऊन त्यांना मदत करणे हे आपले कर्तव्य आहे. तसेच आरोग्य सेवकांनीही कुणालाही अपमानकारक वाटेल अशी वागणूक देऊ नये. सर्वांना सन्मानाने आरोग्य सेवा मिळायला हव्यात.

गावात मिळणाऱ्या आरोग्य सेवा व आरोग्य कर्मचाऱ्यांची माहिती आपण घेतली. या माहितीच्या आधारे गावातून एक पाहणी करून मिळणाऱ्या आरोग्य सेवांबद्दल ठोस माहिती खालील प्रकारे मिळू शकेल.-

गावात मिळणाऱ्या सरकारी आरोग्य-सेवेबाबत पहाणी

आरोग्य संवादासाठी काही ठोस माहिती मिळवल्यास या माहितीच्या आधारे सध्याच्या यंत्रणेत काय कमतरता आहेत हे समजू शकेल. काही गावांची निवड करून खालील प्रश्नांच्या आधारे एक साधे सर्वेक्षण शक्य आहे.

निवडलेल्या प्रत्येक गावातील साधारणतः २० अशी घरे निवडावीत की ज्यामध्ये दोन वर्षापेक्षा लहान मुले आहेत. त्यांच्याशी चर्चा करून नर्सबाईंची कामे, लसीकरण, बाळंतपणाबद्दलच्या सुविधा, ही माहिती मिळू शकेल. यासाठी गावकऱ्यांना खालील प्रश्न विचारूया-

१. तुमच्या दोन वर्षाखालील मुलांना बी.सी.जी. लस दिली होती का? (डाव्या खांद्यावर खूण आहे का पहा)

२. तुमचे बाळंतपण दवाखान्यात किंवा गावातल्या प्रशिक्षित दाईने किट वापरून केले होते का?

३. तुम्हाला गरोदरपणात धनुर्वाताची लस आणि लोहाच्या गोळ्या मिळाल्या होत्या का?

सरकारी दवाखान्यात आरोग्य संवाद

जन आरोग्य समितीच्या शिष्टमंडळाने ग्रामीण रुग्णालयास भेट दिली

कोल्हापूर, (ता. आजरा) : येथील ग्रामीण रुग्णालयाबाबत असलेल्या तक्रारींबद्दल एका शिष्टमंडळाने आज रुग्णालयाच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांची भेट घेतली. दवाखान्यातून औषधे न मिळणे, सरकारी डॉक्टरांची खाजगी प्रॅक्टीस, केसपेपर व्यतिरिक्त रुग्णांकडून पैसे घेणे अशा तक्रारी शिष्टमंडळाने यावेळी केल्या आहेत. शिष्टमंडळाच्या प्रश्नांना ग्रामीण रुग्णालयाच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांनी सविस्तर उत्तरे दिली.

जन आरोग्य समिती, आजरा व श्रमिक मुक्ती दल या संघटनेने तालुक्यातील ग्रामीण रुग्णालयात सुधारणा व्हावी यासाठी प्रयत्न चालवले आहेत. समिती व संघटनेतर्फे उपस्थित केलेल्या प्रश्नांना उत्तरे देताना डॉक्टरांनी यापुढे प्रशासकीय वेळेत खाजगी दवाखाना चालवणार नसल्याचे आश्वासन दिले. केसपेपर व्यतिरिक्त रुग्णांकडून पैसे घेतले जाऊ नयेत म्हणून शिष्टमंडळाने डॉक्टरांच्या संमतीने, **'या दवाखान्यात कोणत्याही सेवेसाठी केसपेपर शिवाय पैसे स्विकारले जात नाहीत'** असा फलक चिकटवला. तसेच दवाखान्यात उपलब्ध औषधांची यादीही लोकांच्या माहितीसाठी फलकावर लावण्याचे मान्य केले गेले. शिष्टमंडळात शेतकरी बांधवांसहीत, प्राध्यापक, विद्यार्थी व सामाजिक कार्यकर्त्यांचा समावेश होता.

ही बातमी वाचलीत का? बातमीतील घटनेप्रमाणे, आपल्या भागातील रुग्णालयाशी संबधित प्रश्नांची चर्चा रुग्णालयाच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांसोबत आपण आयोजित करू शकतो.

प्रश्न उपस्थित करतांना ते प्रश्न सोडवण्यासाठी आपली सहकार्याचीही तयारी असावी. ग्रामीण रुग्णालय, प्राथमिक आरोग्य केंद्र, उपकेंद्र अशा विविध पातळ्यांवर असा आरोग्य संवाद आपण साधू शकतो. हा आरोग्य संवाद साधतांना काही पूर्वतयारी करायला हवी. ती कोणती हे जाणून घेऊ.

आरोग्य-संवादासाठी पूर्वतयारी

शासकीय आरोग्य यंत्रणेशी आरोग्य-संवाद करतांना साधारणपणे ब्लॉक निवडणे जास्त सोईस्कर. ब्लॉकपातळीवर आरोग्य संवाद करण्यासाठी आपल्याला खालील गोष्टी कराव्या लागतील-

- कोणत्या विभागात संवाद आयोजित करायचा आहे, हे ठरविणे (एक तालुका, एक ब्लॉक इ.)

- आपल्या विभागासाठी अपेक्षित सेवांची यादी तयार करणे. (पुढे प्रत्येक पातळीवरील आरोग्य सेवांची माहिती दिली आहे. उदा.- प्राथमिक आरोग्य केन्द्रावर आरोग्य संवाद घडवायचा असल्यास प्रा.आ. केंद्रात अपेक्षित खालील यादीचा वापर करावा)

- आरोग्य-संवादात भाग घेणारी १०-२० गावे निवडावी. शक्यतो अशी गावे निवडावी की ज्यावरुन संपूर्ण विभागाच्या प्रश्नांचे प्रतिनिधित्व होईल. विशेषतः जी गावे दुर्गम आहेत, आदिवासी किंवा दलित लोकसंख्या जिथे जास्त आहे, अशांचाही समावेश असावा.

- या गावांमध्ये चर्चा करून लोकांचा अनुभव व दृष्टीकोण समजून घ्यावा व लोकांमध्ये आरोग्य-सेवांबद्दल जागृती करावी. चर्चेमध्ये स्त्रियांची सक्रिय भागीदारी असावी.

- ज्या पातळीवर आरोग्य संवाद घडवायचा असेल त्या पातळीच्या आरोग्य अधिकाऱ्यांची आधी भेट घेऊन ठरावीक दिवस निश्चित केल्यास हे अधिकारी व संबधित कर्मचारी आरोग्य संवादास उपस्थित राहतील.

- सर्व सहभागी गावातील लोकांच्या प्रतिनिधींबरोबर शिबीर किंवा बैठक घेऊन एकूण परिस्थितीचे आकलन करणे व ती सुधारण्यासाठी कार्यक्रम ठरवणे. गावांमधून चित्ररूप प्रदर्शने, सह्यांची मोहीम, बैठका, सभा, पत्रके यामार्फत जागृती घडवल्यास सर्वांचा सक्रीय सहभाग घेणे शक्य होईल.

विविध टप्प्यांवर अपेक्षित आरोग्य सेवा

कोणत्या पातळीवर कोणत्या सेवा अपेक्षित आहेत हे जाणून घेतल्यास आरोग्य अधिकाऱ्यांशी चर्चा करता येऊ शकेल.

१) उपकेंद्र

आरोग्य सेविका/सेवक हे कर्मचारी आपल्या गावात आरोग्य सेवा पोचवतात. परंतु तातडीच्या परिस्थितीत प्राथमिक उपचार, रोगप्रतिबंधासाठीचे उपाय करता यावेत यासाठी उपकेंद्र कार्यरत असते. मागास, डोंगराळ व आदिवासी भागात दर ३,००० व इतर भागात ५,००० लोकसंख्येमागे एक उपकेंद्र असायला हवे.

उपकेंद्रातील कर्मचारी-

एक स्त्री-आरोग्य सेविका व एक आरोग्य सेवक (पुरुष) उपकेंद्रात असायला हवेत. या शिवाय एक महिला मदतनीस असायला हवी. आरोग्य सेवकांच्या निवासाची व्यवस्था उपकेंद्राजवळ असायला हवी.

उपकेंद्रात आवश्यक औषधे-

रक्तवाढीसाठी गोळ्या, हाडांची बळकटी, संडास साफ न होणे, छातीत जळजळ, पोट डब होणे, रोगप्रतिकार शक्ती वाढवणारी औषधे, त्वचारोग, उलटी होणे, गरगरणे, बाळंतपणानंतरचा रक्तस्त्राव लवकर थांबवण्यासाठी औषधे, बाळंत स्त्रीची वार बाहेर पडण्यासाठी इत्यादी विविध २७ आवश्यक औषधांचा कायम, पुरेसा साठा हवा.

उपकेंद्रात आवश्यक साधने-

रक्तदाब तपासण्याचे यंत्र (बी.पी. ॲपॅरेटस), निर्जंतुकीकरणाचे साधन (स्टेरलायजर इन्स्ट्रूमेंट), वजनकाटा, एका वेळी वापरले जाणारे (डीस्पोजेबल) बाळंतपणाचे किट.

उपकेंद्रातून मिळणाऱ्या सेवा-

- स्त्री-आरोग्य सेविकेतर्फे रोज दुपारी दवाखाना.
- गरोदर स्त्रियांची नोंदणी
- लहान बाळांना नियमित लस मिळणे.
- गरोदर बायांची नियमित तपासणी व सल्ला-मार्गदर्शन.
- आठवड्यातून एकदा डॉक्टरांची भेट, तपासणी व उपचार.
- कुटुंब नियोजनाच्या साधनांचे मोफत वाटप.

२) प्राथमिक आरोग्य केंद्र

प्राथमिक आरोग्य केंद्र म्हणजे ग्रामीण आरोग्य सेवेचा आधारस्तंभ. डोंगराळ/आदिवासी भागामध्ये वीस हजार लोकसंख्येमागे व इतर भागामध्ये तीस हजार लोकसंख्येमागे एक प्रा. आ. केंद्र असायला हवे असे सरकारचे उद्दिष्ट आहे. प्रा. आ. केंद्रात उपचारांसाठी केसपेपरचे ५ रुपये घेतले जातात. बाकी सर्व उपचार मोफत मिळायला हवे-

प्रा. आ. केंद्रातील अपेक्षित कर्मचारी -

- निवासी डॉक्टर- २
- नर्स- १
- आरोग्य-सहाय्यक (स्त्री)- १
- आरोग्य-सहाय्यक (पुरुष)- १
- कंपांउंडर- १
- प्रयोगशाळा तंत्रज्ञ- १
- सफाई कामगार
- वाहनचालक

प्रा. आ. केंद्रात आवश्यक औषधे-

अत्यावश्यक औषधांच्या सूचीनूसार ११२ औषधांचा कायम व पुरेसा पुरवठा प्रा. आ. केंद्रात असावा. सर्पदंशविरोधी इंजेक्शन, कुत्रा चावण्याच्या विरोधी लस, हिवताप (मलेरिया), क्षयरोग (टी.बी.) व कुष्ठरोगावरील औषधे तसेच जुलाब, ताप यासारख्या साध्या आजारांवरील उपचारासाठीची औषधे प्रा. आ. केंद्रात असावीत.

कोणत्याही रुग्णाला औषधे विकत आणायला सांगितली जात असतील तर त्यामागील कारणांचा शोध घेऊन नेहमीची शक्यतो सर्व औषधे दवाखान्यातच मोफत मिळावीत यासाठी प्रयत्न करा.

प्रा. आ. केंद्रात आवश्यक साधने-

- रुग्णांना दाखल करुन घेण्यासाठी ६ खाटांची सोय
- शस्त्रक्रियागृह
- बाळंतपणाची खोली व बाळंतपणासाठी खास टेबल

- लसी ठेवण्यासाठी विशिष्ट प्रकारचा फ्रीज (ILR) / Deep Freezer
- निर्जन्तुकीकरण करण्यासाठीचे यंत्र
- सूक्ष्मदर्शक यंत्र
- २४ तास ॲम्ब्युलन्स सेवा

प्रा. आ. केंद्रात मिळणाऱ्या सेवा-

- चालू स्थितीतील शस्त्रक्रियागृह
- रोज सकाळ-संध्याकाळ डॉक्टरांचा दवाखाना. (OPD)
- गरजेनुसार रक्त, लघवी, थुंकी यांची साधी तपासणी.
- गंभीर आजाऱ्याला दाखल करायची सोय.
- २४ तास तातडीची सेवा (साप चावणे, अपघात इ. साठी)
- गंभीर आजाऱ्याला कुटिर, ग्रामीण रुग्णालय इ. ठिकाणी पाठवण्यासाठी वाहनाची सोय.
- साथीचे रोग येऊ नयेत म्हणून डासांवर नियंत्रणासाठी फवारणी व पिण्याच्या पाण्याचे क्लोरिनने शुध्दीकरण, इत्यादी उपाय.
- बाळंतपणाची सोय
- शस्त्रक्रियागृह, (गळूमधील पू काढणे यासारख्या लहान शस्त्रक्रिया)
- बाळंतपणाची खोली
- ठराविक दिवशी मोतीबिंदूचे ऑपरेशन
- जखमेवरील टाके घालून उपचार, हाड मोडण्यावरील प्राथमिक उपचार
- विषबाधेवरील व भाजण्यावरील प्राथमिक उपचार
- दाखल केलेल्या रुग्णाला व सोबतच्या व्यक्तीस जेवण व चहा.

• प्राथमिक आरोग्य केंद्रात महिलांच्या आजारांवर उपचारांसाठी महिला डॉक्टर उपलब्ध असण्याची मागणी करा

• प्रा. आ. केंद्र पातळीवर एक आरोग्य समिती जनतेच्या सहभागाकरिता नेमलेली असते. ही समिती काय करते याची माहिती घ्या.

• आरोग्य सेवा सुधारण्यासाठी या आरोग्य समितीला कार्यरत करा.

ग्रामीण रुग्णालय

प्रा. आ. केंद्रास पूरक संदर्भ सेवा देण्याचे काम ग्रामीण रुग्णालयातून होते. विशेषज्ञ डॉक्टरांच्या सेवा, तपासणी व उपचारांसाठी प्रत्येक ब्लॉकमध्ये एक ग्रामीण रुग्णालय असते. ग्रामीण रुग्णालयाजवळ डॉक्टरांच्या निवासाची व्यवस्था असायला हवी.

- **ग्रामीण रुग्णालयातून मिळणाऱ्या सेवा -**

बाह्य रुग्ण सेवा नेहमीच्या (OPD), शस्त्रक्रिया व अवघड बाळंतपणासाठी शस्त्रक्रिया, त्यासाठी सुसज्ज शस्त्रक्रियागृह, बाळंतपणासाठी प्रसूति कक्षाची व्यवस्था, तीस आजाऱ्यांना दाखल करण्याची सोय, क्ष-किरण तपासणी, रक्त, लघवी तपासणी इत्यादी तपासण्या. यासाठी उपयुक्त कर्मचारी, साथीच्या आजारांवर लक्ष ठेवण्याची यंत्रणा इत्यादी सेवा ग्रामीण रुग्णालयात उपलब्ध असाव्यात.

ग्रामीण रुग्णालयातील अपेक्षित कर्मचारी -

क्र.	कर्मचाऱ्यांचा हुद्दा	अपेक्षित संख्या
१	वैद्यकीय अधिक्षक	१
२	वैद्यकीय अधिकारी (तज्ज्ञ)	३
३	वैद्यकीय अधिकारी (निवासी)	३
४	प्रमुख नर्स	१
५	स्टाफ नर्सेस्	७
६	एक्स-रे तज्ञ	१
७	प्रयोगशाळा तज्ञ	१
८	कंपाऊंडर	२
९	वाहन चालक	१

ग्रामीण रुग्णालयात भूलतज्ञ, बालरोग तज्ञ, स्त्रीरोग तज्ञ, शल्यक्रिया तज्ञ इत्यादी विशेष तज्ञांच्या सेवा मिळणे अपेक्षित आहे.

उपकेंद्र, प्रा. आ. केंद्र व ग्रामीण रुग्णालयात पुरेशा पाण्याची व्यवस्था, वीजेची सोय, दवाखान्यापर्यंत पोचण्यासाठी पक्के रस्ते असतील तर या सर्व सेवांचा आपल्याला व्यवस्थित लाभ होऊ शकेल. या सेवांची कमतरता असल्यास आरोग्य कर्मचाऱ्यांसोबत आपणही या समस्या सोडवण्यासाठी प्रयत्न करायला हवेत. आपण निवडून दिलेले लोकप्रतिनिधी या समस्या सोडवण्यासाठी काय करत आहेत ?

या सेवा मिळतात का याची पहाणी

सरकारी आरोग्य यंत्रणेची माहिती आपण जाणून घेतली. या सेवा गावात मिळतात की नाही याची ठोस माहिती मिळवण्यासाठी आपण खालील प्रश्नांचा आधार घेऊ शकतो.

या प्रश्नांच्या आधारे गावपातळीवर मिळणाऱ्या आरोग्य सेवांचे मूल्यमापन कार्यकर्त्यांनी कसे करावे, हे देखील पुढे दिले आहे. गावकऱ्यांची एक बैठक घेऊन खालील मुद्द्यांच्या आधारे सामुदायिक चर्चा घडवून या प्रश्नांची उत्तरे मिळवता येतील.

गावात / उपकेंद्रात

१. गावातील सर्व सहा वर्षांखालील मुलांना अंगणवाडीत रोज जेवण/ पूरक आहार मिळतो का?

२. उपकेंद्रात दररोज साध्या आजारांवर औषधोपचार व आवश्यक औषधे मिळतात का?

प्राथमिक आरोग्य केंद्रात

१. प्राथमिक आरोग्य केंद्रात सर्व आवश्यक ती औषधे मोफत मिळतात का? तिथले डॉक्टर बाहेरचे औषध लिहून न देता, आरोग्य केंद्रातल्याच औषधांनी उपचार करतात का?

२. प्राथमिक आरोग्य केंद्रात आठवड्यातले सर्व दिवस, २४ तास डॉक्टर उपलब्ध असतात का?

३. सामान्य बाळंतपणाची सोय आणि वेळ पडल्यास रुग्णाला भरती करण्याची सोय दवाखान्यात आहे का?

ग्रामीण रुग्णालयात

१. ग्रामीण रुग्णालयात चार तज्ञ डॉक्टर आहेत का? तिथे अवघड बाळंतपण किंवा इतर आजारांसाठी शस्त्रक्रिया केली जाते का?

२. ग्रामीण रुग्णालयात क्ष-किरण तपासणीची सोय आहे का?

या तीन केंद्रांमार्फत अनेक सेवा मिळतील असे सरकारचे जाहीर धोरण आहे. प्रत्यक्षात या केंद्रांची स्थिती कशी आहे, कोणत्या सेवा कितपत मिळतात याची पध्दतशीर पाहणी करण्यासाठी 'जन आरोग्य अभियान' ने एक तपशीलवार प्रश्नावली बनवली आहे. तिच्या आधारे एखादी संस्था/संघटना अशी पाहणी करु शकते. या प्रश्नावली साठी 'सेहत' शी संपर्क साधावा. वर दिलेले प्रश्न केवळ नमुन्यादाखल आहेत. पध्दतशीर पाहणी करण्यासाठी या प्रश्नावलीचा उपयोग करणे योग्य ठरेल.

आरोग्य संवादाचा पाठपुरावा- कॅलेंडर कार्यक्रम

विविध पातळ्यांवर सरकारी आरोग्य यंत्रणेशी आरोग्य संवादाबद्दलची माहिती आपण घेतली. आपल्या भागातील आरोग्य सेवांचा दर्जा सुधारण्यासाठी व या सेवा योग्य रितीने मिळवून घेण्यासाठी आरोग्य संवाद हा मार्ग आहे. परंतु ही प्रक्रिया सातत्याने चालू राहणे देखील महत्वाचे आहे. यासाठी त्याचा पाठपुरावा आरोग्य सेवा कॅलेंडर कार्यक्रमाने होऊ शकतो. या पद्धतीची आता आपण माहिती घेवू-

गावपातळीवर आपल्याला स्त्री आरोग्य सेविका (ANM) व पुरुष आरोग्य सेवक (MPW) यांच्याकडून आरोग्य सेवा मिळतात. या दोन्हीही आरोग्य सेवकांनी आपल्या गावात येऊन नियमितपणे लसीकरण, गरोदर मातांना सल्ला देणे, विशिष्ट आजारांचा पाठपुरावा, पाण्याचे निर्जंतुकीकरण, साध्या आजारांवरील उपचार इ. सेवा देणे अपेक्षित आहे. बहुतेक वेळा आपल्याला या सेवकांची कामे माहीत नसतात किंवा माहीत असली तरी ते कोणत्या दिवशी गावात येतात हे समजू शकत नाही. यावर उपाय म्हणून गावातील लोक या सेवकांच्या कामांवर **आरोग्य सेवा कॅलेंडर** द्वारे देखरेख ठेऊ शकतात व त्यांना कामात सहकार्य करू शकतात.

यासाठी आपल्याला गावात आरोग्य सेवकांबरोबर गावाची बैठक घ्यावी लागेल. या बैठकीत सरकारी कर्मचाऱ्यांनी महिन्याभरात गावात केलेली वेगवेगळी कामे, तसेच पुढच्या काळात गावाने आरोग्याबाबत काय खबरदारी घ्यावी याबद्दलची चर्चा होईल. तसेच पुढच्या महिन्यातील आरोग्य सेवकांचा कार्यक्रम याच बैठकीत ठरवावा. आरोग्यसेवक, आपल्या वेळापत्रकानुसार त्यांच्या गावात येण्याच्या निश्चित तारखा लोकांना सांगतील तसेच या तारखांना ते कोणते काम करणार याबद्दलची आगाऊ माहिती सांगतील. त्यानुसार गावातील आरोग्य सेवेचे वेळापत्रक बनवावे व संबंधित कर्मचाऱ्यांशी सहकार्य करावे (उदा. लसीकरणाची जी तारीख सेवकांनी ठरवली असेल त्या तारखेस गावातील लोकांनी आपल्या मुलांना लसीकरणासाठी घेऊन जावे.)

यासाठी एक दर महिन्याचे आरोग्य सेवा कॅलेंडर बनवावे. गावात ठराविक ठिकाणी हे कॅलेंडर सर्वांना दिसेल असे ठेवावे. या कॅलेंडरवर आरोग्य सेवकांनी सांगितलेल्या तारखेवर खूण करून ठेवावी. ते जे काम करणार असतील त्याची थोडक्यात नोंद करावी. आरोग्य सेवकांनी दर गावभेटीला या कॅलेंडर वरील निश्चित केलेल्या तारखेवर सही करावी. जर त्यांनी ठरवलेल्या तारखेस गावात येऊन ठरलेले काम केले नाही तर त्या तारखेवर फुलीची खूण (X) करावी. म्हणजेच ठरल्यानुसार काम झाले नाही असा त्याचा अर्थ होतो.

कॅलेंडर कार्यक्रमातुन काय होईल?

- गावपातळीवर उपलब्ध असणाऱ्या सरकारी सेवांची माहिती गावकऱ्यांना मिळेल.
- कोणती सेवा कोणत्या दिवशी मिळेल याचे मासिक वेळापत्रक माहीत होईल. त्यामुळे या सेवा मिळण्यात सुधारणा होईल.
- सरकारी आरोग्य सेवकांना गावकऱ्यांचे सहकार्य मिळेल.
- गावपातळीवरील आरोग्य सेवांमध्ये नियमितपणा येऊ शकेल.
- आरोग्य सेवांच्या नियोजनात लोकांचा सहभाग राहील.
- चांगल्या आरोग्य सेवांसाठी सरकारी सेवक व गावकरी मिळून उपाय योजना करू शकतील.

खाजगी डॉक्टरांशी आरोग्य संवाद

इंजेक्शन- सलाईनची फसवणूक थांबवली पाहिजे!

डहाणू तालुक्यातील पाड्या-पाड्यावर इंजेक्शन- सलाईन जागृती मोहीम मे २००० मध्ये राबवली गेली. 'सलाईन म्हणजे भारी इलाज!' व 'इंजेक्शन शिवाय बरे वाटणार नाही' असे समज समाजात खोलवर रूजले आहेत. याबद्दलची शास्त्रीय तत्थे समजावून सांगण्यासाठी गावात मिटींग व्हायची. चित्ररूप पोस्टर्स प्रदर्शनातून मुद्दा समजावला जायचा. या जागृतीचा परिणाम झाला तो असा-

डहाणूच्या खाजगी डॉक्टरांच्या दवाखान्यात आदिवासी स्त्रिया व पुरूष आरोग्य संवाद पदयात्रा घेवून आले. डॉक्टर दवाखान्यातून बाहेर आले की प्रश्न विचारले जायचे, सलाईनची किंमत किती? उत्तर "२०-२५ रु." असायचे. मग जमाव विचारायचा "पण डॉक्टर तुम्ही एका बाटलीचे १०० रु. घेता, असे का?"

इंजेक्शन बद्दलही असेच व्हायचे. मग इंजेक्शन सलाईन लावण्याची खरी गरज केव्हा आहे याबद्दल व इंजेक्शन / सलाईन बद्दल प्रबोधन करणारी दोन पोस्टर्स डॉक्टरांच्या संमतीने दवाखान्यात चिकटवली जात.

डॉक्टरांचा निरोप घेताना ही फसवणूक थांबावी म्हणून "आम्हीही इंजेक्शन /सलाईन विनाकारण मागणार नाही तुम्हीही देऊ नका" अशा आशयाचे 'प्रिय डॉक्टर' हे पत्र डॉक्टरांना दिले जायचे.

सरकारी आरोग्य सेवा काही घोषित उद्दिष्टांसाठी काम करते आणि त्याबाबत लोक जाब विचारु शकतात. पण खाजगी सेवेबद्दल परिस्थिती वेगळी आहे. खाजगी दवाखान्यात डॉक्टर -तुम्हाला माझी सेवा योग्य वाटत नसेल तर माझ्याकडे येऊ नका. माझ्यावर बंधन आणणारे तुम्ही कोण?' असे म्हणू शकतात. म्हणून खाजगी डॉक्टरांबरोबर संवाद करताना आपल्याला सामाजिक संदर्भ आणि शास्त्रीय उपचारांचे नियम यांचा आधार घ्यावा लागतो.

काही निवडक मुद्दे असे आहेत की, ज्यांच्याबद्दल आपण खाजगी डॉक्टरांबरोबर चर्चा करु शकतो व शास्त्रीय उपचारांबद्दल सर्वांच्या संमतीने काही तत्वे ठरवू शकतो. त्याचे एक उदाहरण म्हणजे सलाईनचा दुरुपयोग टाळण्यासाठी तत्वे ठरविणे. वैद्यकीय शास्त्रामध्ये फक्त काही विशेष परिस्थितीत रोग्याला सलाईन लावायची गरज असते, याबद्दल दुमत नाही. डॉक्टरांनी अनावश्यक सलाईन लावण्याचा प्रकार, डॉक्टर नसलेला एक साधारण कार्यकर्ता सुध्दा ओळखू शकतो. या मुद्दयावर आधी लोकांना किमान माहिती दिली पाहिजे व जागृती झाली पाहिजे. यासाठी 'प्रिय डॉक्टर ' पत्राचा उपयोग होईल. (हे पत्र पुढील पानावर दिले आहे). या पत्रामध्ये लोकांतर्फे डॉक्टरांना विनंती केली आहे. गावोगावी बैठका घेऊन लोकांना माहिती देऊन, पत्रावर लोकांच्या सह्या घेता येतील. डॉक्टरांना भेटतांना, त्यांना हे पत्र द्यावे.

हा मुद्दा घेऊन डॉक्टरांच्या संघटनेबरोबर किंवा व्यक्तिगत पातळीवर काही डॉक्टरांबरोबर चर्चा करता येईल. चर्चेमध्ये सलाईन लावायची गरज नेमकी केव्हा असते हे एकमताने ठरवता येईल. सलाईन म्हणजे मिठाचे पाणी हे पोस्टर डॉक्टरांच्या दवाखान्यात लावता येईल.

तसेच गरज नसताना इंजेक्शन देण्याचा मुद्दा ही घेता येईल. याबद्दलसुध्दा काही शास्त्रीय नियम पाळले पाहिजेत यासाठी डॉक्टरांबरोबर चर्चा करता येईल. सेहत संस्थेने प्रकाशित केलेले इंजेक्शन व सलाईन च्या दुरुपयोगाबाबत प्रबोधन करणारी पोस्टर्स या मोहिमेसाठी वापरता येतील. (हे पोस्टर्स परिशिष्ट १, २ मध्ये दिले आहेत.)

शहरांमध्ये I.C.U. (Intensive Care Unit) - येथे उपलब्ध असणाऱ्या किमान सोयींचा मुद्दा ही घेता येईल कारण या सोयी आहेत की नाहीत हे तपासणे सोपे आहे.

इंजेक्शन-सलाईनच्या दुरुपयोगाबाबत महाराष्ट्रात २००० साली 'जन-आरोग्य-संसद' मोहीमेत ठिकठिकाणी खाजगी डॉक्टरांशी यशस्वी संवाद झाले. २००४ मध्ये कोल्हापूर जिल्ह्यात आजरा येथे श्रमिक मुक्ती दलाने याच मुद्यावर प्रबोधन पदयात्रा आयोजित केली. या पदयात्रेत शाळेतल्या विद्यार्थ्यांसहित गावकरी सामील झाले. डॉक्टरांच्या स्थानिक संघटनेनेही या पदयात्रेला पाठिंबा दिला.

डॉक्टरांना जाहीर पत्र

प्रिय डॉक्टर,

इंजेक्शन व सलाईन याचा दुरूपयोग टाळण्यासाठी आम्ही तुम्हाला हे विनंती पत्र लिहीत आहोत.

आरोग्य शिक्षणामुळे आता आम्हाला समजले आहे की, साध्या आजारात इंजेक्शनची सहसा गरज नसते. गंभीर आजार, बेशुध्दी व सतत उलट्या, काही लसी व काही खास औषधे, फक्त यांच्यासाठी इंजेक्शनची गरज असते. तसेच इंजेक्शन घेण्यामध्ये काही धोके असतात. त्यामुळे साधा ताप, खोकला, पोटदुखी, अंगदुखी, अशक्तपणा यासाठी आम्ही तुमच्याकडे इंजेक्शन मागणार नाही व तुम्हीही अशा आजारात इंजेक्शन देऊ नये, ही विनंती. आम्ही कष्टाने मिळवलेले पैसे अकारण इंजेक्शनवर खर्च होणे, हे यापुढे थांबले पाहिजे.

आम्हाला याचीही जाणीव आता झाली आहे, की सलाईनची बाटली म्हणजे शुध्द मिठाच्या पाण्याची बाटली असते. बेशुध्दी, सतत उलट्या, वेगाने रक्तस्त्राव, गंभीर शोष, गंभीर आजार, शस्त्रक्रिया, थेंब थेंब औषध सतत शरीरात देणे, अशा प्रसंगी फक्त सलाईनची गरज असते. इतर वेळी सलाईन देणे-घेणे चुकीचे आहे. सलाईनने ताकद येत नाही. जो आजारी पाणी पिऊ शकतो त्याला सहसा सलाईन द्यायची गरज नसते. त्यामुळे आम्ही तुमच्याकडे अशा वेळी सलाईनच्या किंवा ग्लुकोजच्या बाटलीची मागणी करणार नाही. तुम्हीही अकारण बाटली आजाऱ्याला लावू नये, ही विनंती.

सलाईनची बाटली, त्याची नळी, सुई मिळून डॉक्टरला एका बाटलीमागे २०-२५ रुपये खर्च येतो. त्यामुळे दर बाटलीमागे ५० रुपयांपेक्षा जास्त पैसे घेता कामा नयेत. आम्ही मोठ्या कष्टांनी मिळवलेला पैसा अकारण इंजेक्शन व सलाईनवर खर्च होऊ नये यासाठी आपण सहकार्य करावे, अशी आम्ही मागणी करतो.

आपले,
जागरुक नागरिक

आरोग्य सेवाच्या हक्कांकरिता जनसुनवाई

आरोग्य सेवा सुरळीत व सन्मानाने मिळाव्यात यासाठी आरोग्य संवाद हे माध्यम आहे, सरकारी आरोग्य कर्मचाऱ्यांशी संवाद व लोकजागृती यामार्फत आपण गावपातळीच्या आरोग्य सेवा मिळवू शकू. परंतु सरकारी सेवेवर व्यापक जनमताचा दबाव आणणेही गरजेचे आहे. असा दबाव आपण जन सुनवाई मार्फत आणू शकतो. आरोग्य सेवांचा हक्क प्रस्थापित करण्याच्या मोहिमेत 'जन सुनवाई' हे एक महत्वाचे माध्यम आहे.

आरोग्य-सेवांबाबतच्या लोकांच्या तक्रारी एका समितीपुढे जाहीरपणे मांडणे व त्यावेळी सरकारी आधिकाऱ्यांकडे त्याबाबतचे स्पष्टीकरण मागणे म्हणजे जनसुनवाई.

जन आरोग्य अभियान मार्फत राज्यात व देशात विविध पातळ्यांवर 'आरोग्य सेवांचा हक्क' या विषयावर 'जन सुनवाई' आयोजित करुन धोरणात्मक पातळीवर दबाव निर्माण करणे व त्याआधारे जनमत बनवून हक्काच्या आरोग्य सेवांबाबत जनतेचा रेटा वाढवणे अशी व्यूहरचना केली जात आहे. अशी जनसुनवाई आयोजित करताना खालील बाबी विचारात घ्याव्यात-

१) सरकारी आरोग्य सेवांच्या उपलब्धतेविषयी माहिती जमवणे

आपापल्या भागातील सरकारी प्राथमिक आरोग्य केन्द्रे, ग्रामीण रुग्णालय यांची माहिती जमवून ही माहिती प्रत्यक्ष जन सुनवाईत अकार्यक्षम व अपुऱ्या आरोग्य सेवांचा ठोस पुरावा म्हणून मांडता येऊ शकते. (ही माहिती मिळवण्यासाठी पा.क्र. १९ वर उल्लेखिलेल्या प्रश्नावली चा आधार घ्यावा.)

२) जनसुनवाईतील जनतेचे पक्षकार

जनसुनवाई जरी स्थानिक संस्था/संघटनांनी केली असली तरी आपणच या जनसुनवाईत जनतेचे पक्षकार म्हणून भूमिका निभावतो. यासाठी सरकारी यंत्रणेवर अतिशय संयमाने व मुद्देसुदपणे माहितीपूर्ण आरोप ठेवायला हवेत.

३) जनसुनवाईतील सरकार पक्ष - शासकीय आरोग्य अधिकारी

आपण ज्या पातळीवर जनसुनवाई आयोजित करत आहोत त्या पातळीवरील धोरणात्मक निर्णय घेणारे अधिकारी या जनसुनवाईत सरकार पक्ष म्हणून उपस्थित असणे आवश्यक आहे.

शिवाय ज्या प्रा. आ. केन्द्र, ग्रामीण रुग्णालय यांच्याबाबतच्या तक्रारी जनसुनवाईत उपस्थित केल्या जातील तेथील वैद्यकीय अधिकारीही या जनसुनवाईत उपस्थित केलेल्या प्रश्नांवर खुलासा देण्यासाठी हजर असायला हवेत.

४) जनसुनवाईचा निकाल सुनावणारे - तज्ञांचे पॅनेल (समिती)

दोन्ही पक्षकारांची बाजू ऐकून, गरज पडल्यास बाजू मांडतांना पक्षकारांना थांबवून स्पष्टीकरण मागू शकणारे, तसेच माहितीची सत्यता पडताळून त्याबाबत मत देणाऱ्या तीन-चार तज्ञांच्या पॅनेलची जनसुनवाईत महत्वाची भूमिका आहे. पॅनल मध्ये सामाजिक, आरोग्य, पत्रकारिता, विविध क्षेत्रातील मान्यवर असावेत. त्यांच्या वक्तव्यांना, मतांना समाजात व्यापक मान्यता असल्यामुळे त्यांनी दिलेल्या मताचा पुढे गंभीरतेने विचार होऊ शकतो. शिवाय जनमत घडवण्यातही अशा तंज्ञांच्या मताचा उपयोग होऊ शकतो.

५) पॅनेलचा अहवाल

जनसुनवाईत जनतेची बाजू मांडल्यानंतर व सरकारी पक्षाने त्यावर दिलेल्या खुलाशानंतर पॅनेल परस्पर विचार-विनिमय करून आपले स्वतंत्र मतप्रदर्शन करेलच शिवाय शक्य झाल्यास पॅनेलतर्फे एक लेखी अहवाल घेवून हा अहवाल राष्ट्रीय मानवाधिकार आयोगास पाठविल्यास मोहीम सशक्त होण्यास त्याचा उपयोग होऊ शकेल.

६) जनसुनवाईचा प्रस्तावित आराखडा

- जनसुनवाईची प्रस्तावना
- संस्था /संघटनांनी मिळवलेल्या माहितीची मांडणी व ठोस कमतरता/आरोप
- काही व्यक्ती ज्यांना आरोग्य सेवा नाकारल्या आहेत अशांची छोटी मांडणी (केस स्टडी).
- सरकार पक्षाकडून खुलासा/ठोस आश्वासने मिळवणे.
- पॅनेलचे विचार-विनिमय करुन मत प्रदर्शन
- जनसुनवाईतून पुढे आलेल्या मुद्दयांबाबत ठोस मागण्या व आंदोलनाची पुढील दिशा स्पष्ट मांडणे.
- समारोप

साधारणतः जनसुनवाईचे स्वरुप वरील प्रकारे असायला हवे. स्थानिक नियोजनानुसार यात सुधारणा करून जन सुनवाई अधिक प्रभावीपणे आपण करु शकता.

सलाईन म्हणजे मिठाचे पाणी!

काही आजारांमध्ये पाणी पिता येत नाही किंवा तोंडावाटे पाणी पुरत नाही. अशावेळी थेट रक्तातून पाणी द्यावे लागते. रक्तामध्ये मीठासारखे क्षार असतात. त्यामुळे थेट रक्तातून पाणी देतांना त्यात मीठ वा इतर क्षार घालतात. या निर्जंतुक खारट पाण्याला सलाईन म्हणतात.

डॉक्टरला सलाईनची बाटली १८ रुपयाला मिळते; डॉक्टर ती लावायला किती पैसे घेतात ?

सलाईनची खरी गरज केव्हा असते?

१. पाणी/रक्त शरीराबाहेर वेगाने जात असेल
(उदा. अपघातात रक्त जाणे, जोरदार जुलाब-उलट्या)

२. गंभीर आजारामुळे जिवाला धोका/ शस्त्रक्रियेच्या वेळी

३. आजारी माणूस पाणी पिऊ शकत नसेल
(उदा. जोरदार उलट्या, बेशुध्दी)

४. शिरेतून सतत औषध द्यायचे असेल
(उदा. बाळंतपणात कळा पुरेशा न येणे)

गरज नसतांना सलाईन घेऊ नका सलाईनने ताकद येत नाही !

सलाईनने शरीराला ताकद मिळत नाही, फक्त मीठ-पाणी मिळते. आजारी माणूस तोंडावाटे खाऊ-पिऊ शकत असेल तर त्याला सलाईनची सहसा गरज नसते

जन आरोग्य समिती द्वारा प्रसारित

विनाकारण सलाईन लावणे बंद झाले पाहिजे!

प्रकाशक:
आरोग्य साथी प्रकल्प, सेहत

जर गोळी देई आराम
नको सुईचे जास्त दाम

साध्या आजारात सहसा सुईची गरज नसते

सुई आणि गोळी यात
औषध एकच असते
फरक एवढाच की
सुई पाच-दहा मिनिटात
काम करु लागते
तर गोळीला
अर्धा तास लागतो.
म्हणून
साध्या आजारात
सुईची गरज नसते.

डॉक्टरकडे सुई टोचायची मागणी करु नका !

आरोग्यासाठी पर्याय - आरोग्यासाठी चळवळ !

'जन आरोग्य संसद' साठी प्रसारित

संकल्पना, मांडणी व प्रकाशन - आरोग्य साथी प्रकल्प, सेहत

गावात इंजेक्शन व सलाईन बाबत प्रबोधनासाठी तसेच खाजगी डॉक्टरांशी संवाद करताना परिशिष्ट १ व २ या पोस्टर्सचा उपयोग होईल, हे पोस्टर्स तुम्ही सेहत कार्यालयातून मागवू शकता.

जिल्हा आरोग्य यंत्रणा लोकाभिमुख बनविण्यासाठी ग्रामपातळीवर ग्रामसभे अंतर्गत समिती स्थापन करणे

महाराष्ट्र शासन

सार्वजनिक आरोग्य विभाग

शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०००/प्र.क्र.२६१/कुक-३

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

दिनांक : १० नोव्हेंबर, २०००

प्रस्तावना :

प्राथमिक आरोग्य हा विषय जिल्हा परिषदेकडे सोपविण्यात आलेला आहे. सदर विषयासाठी कार्यान्वित करण्यात आलेली आरोग्य यंत्रणा पूर्णपणे लोकाभिमुख होणे अत्यंत गरजेचे आहे. शासनाने ज्या लोकांसाठी सुविधा पुरवावयाची आहे शक्यतो त्यांचे प्रत्यक्ष नियंत्रण संबंधित यंत्रणेवर असावेत असे तत्व स्वीकारले आहे व ह्या तत्वास अनुसरून ग्राम सभेअंतर्गत आरोग्य समिती स्थापन करण्याची बाब विचारात घेण्यात आली आहे.

शासन निर्णय :-

ग्राम पातळीवरील आरोग्य यंत्रणा लोकाभिमुख होण्यासाठी शासनाने ग्रामसभे अंतर्गत आरोग्य समिती स्थापन करण्यास शासन मान्यता देत आहे. सदर समितीची रचना खालीलप्रमाणे राहील. :-

१. प्रत्येक ग्रामपंचायत क्षेत्रातील प्रत्येक गांवातून किमान ३ सदस्य असावेत.

२. ७० टक्के सदस्य महिला असाव्यात.

३. ग्रामपंचायत किंवा जिल्हा परिषदेच्या सदस्यांची संख्या एकूण ५ पेक्षा अधिक नसावी.

४. सदर समितीवर १५ सदस्य असावेत.

५. समितीने स्वतःच अध्यक्षांची निवड करावी. अध्यक्षांचा कार्यकाळ ३ महिन्यांचा असावा.

६. ग्रामसेवक हे या समितीचे आयोजक राहतील व समितीच्या कामकाजाचा तपशील ठरवण्याची जबाबदारी त्यांचेवर राहील.

७. समितीचा कार्यकाळ एक वर्ष राहील. मात्र सदस्य पुर्ननियुक्तीस पात्र राहतील.

समितीच्या कार्याचे स्वरूप खालीलप्रमाणे राहणार आहे :-

अ. सदर समितीची बैठक महिन्यातून एकदा घेण्यात येईल. या बैठकीत खाली नमूद केलेल्या विषयांची सहाय्यक परिचारिका प्रसाविका व बहुउद्देश कर्मचारी समितीस माहिती देतील. :-

१. ठरलेल्या दिवशी दिलेली ग्रामभेट.

२. अ. गरोदर मातांची नोंदणी - १६ आठवड्यांच्या आत.

ब. गरोदर मातांची नोंदणी - १६ आठवडयाच्या वर.

३. गरोदर मातांची ७ व्या महिन्यापासून तपासणी.

४. गरोदर मातांना लोहयुक्त गोळया व टी.टी.लस.

५. जास्त रक्तदाब किंवा अशक्तपणा असलेल्या स्त्रीयांची वैद्यकीय अधिकाऱ्यांकडून तपासणी.

६. बालमृत्यू

७. कुपोषित ग्रेड ३/४ मुलांच्या बाबतीत माहिती.

८. लसीकरण.

९. पिण्याच्या पाण्याची स्वच्छता.

१०. मलेरिया, कुष्ठरोग, रातआंधळेपणा इत्यादि बाबतीत माहिती.

११. पात्र जोडप्यांची भेट घेवून त्यांना कुटुंब कल्याण साधन वापरण्यास/शस्त्रक्रिया करून घेण्यास प्रवृत्त करणे.

ब. एखाद्या कर्मचाऱ्यांचे काम असमाधानकारक असल्यास समितीने नमूद केल्यानंतर जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद किंवा त्यांनी नामनिर्देशित केलेले अधिकारी यांनी प्रत्यक्ष चौकशी करावी व तद्नंतर आवश्यकतेनुसार योग्य ती कार्यवाही करावी. सदर समितीने सहाय्यक परिचारिका प्रसाविका तसेच बहुउद्देशीय कर्मचारी यांच्या कामाचे मूल्यमापन करून संबंधीत वैद्यकीय अधिकारी व गटविकास अधिकारी पाठवावे व त्यांनी संबंधितांचा गोपनीय अहवाल लिहिताना याचा विचार करावा.

क. सदर समितीचे अहवाल ग्रामसभेच्या वर्षात चार होणा-या वैधानिक बैठकीत सादर करण्यात यावेत.

हा शासन निर्णय ग्राम विकास व जलसंधारण विभागाच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

सुधीर श्रीवास्तव

सचिव (कुटुंब कल्याण)

आरोग्य सेवा महासंचालनालय, मुंबई

महाराष्ट्र शासन

संदर्भ : सआसे/निविमु/आरोग्य संस्था/सूचना फलक/कक्ष-७ दिनांक : ७/१२/२०००

विषय : **आरोग्य संस्थांमध्ये सूचना फलक लावणेबाबत**

प्रिय डॉ.

आपणांस विदितच आहे की, आरोग्य हा प्रत्येकाचा मुलभूत अधिकार आहे असे म्हटले जाते. परंतु मला खेदाने नमूद करावेसे वाटते की, प्रत्यक्षात हा अधिकार सातत्याने नाकरला जात आहे. विशेषतः ग्रामीण भागातील जनतेमध्ये हे प्रमाण जास्त आढळून येते व याचे मुख्य कारण म्हणजे जनतेला प्राथमिक आरोग्य केंद्रांमार्फत दिल्या जाणा-या सेवा व जनतेचे हक्क याचे अज्ञान. आपणांस या सर्व गोष्टी टाळता येऊ शकतात व जनतेला गुणात्मक व परिणामात्मक आरोग्य सेवा मिळण्याच्या दृष्टीने आपणांस खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

१. आपल्या अधिनस्त असलेल्या प्रत्येक ग्रामीण रूग्णालय व प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये फलक लावण्यात यावेत. सदर फलकावर खालील माहिती असावी.

अ. ग्रामीण रूग्णालय/प्राथमिक आरोग्य केंद्रामार्फत देण्यात येणा-या विविध आरोग्य सेवा.

ब. विविध आरोग्य सेवा मिळण्याचे वार व वेळ

क. संस्थेमध्ये प्रमुख औषधांचा शिल्लक साठा

ड. रूग्णांनी सेवा मिळण्याकरिता काही शुल्क भरल्यास त्या पैशाची पावती मागण्याबाबतची आग्रहाची सूचना.

ई. रूग्णास तक्रार करावयाची असल्यास ती कोठे व कशी करावी याबाबतचा सूचनाफलक.

२. वरील सर्व मजकुरांचे फलक केंद्रामध्ये मध्यवर्ती ठिकाणी सुयोग्य पध्दतीने लावण्यात यावेत अशा सूचना आपल्या अधिनस्त असणा-या सर्व संस्थांना त्वरित देण्यात याव्यात.

सदर सूचनांचे काटेकोर पालन करण्यात येऊन आपण केलेल्या कार्यवाहीचा अहवाल महासंचालनालयास त्वरित सादर करावा.

शुभेच्छांसह,

आपला स्नेहांकित,

(सुभाष साळुंखे)

प्रति : सर्व जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रूग्णालय

प्रत : जन आरोग्य संसद - २०००, भारत ज्ञान विज्ञान समुदाय, नारायण पेठ, पुणे - ३० यांना माहितीस्तव.

आरोग्य सेवा महासंचालनालय, मुंबई
महाराष्ट्र शासन

संदर्भ : सआसे/निविमु/आरोग्य संस्था/जनआरोग्य संसद/कक्ष-७ दिनांक : १०/२/२०००

विषय : **आरोग्य कार्यक्रम राबविण्यामध्ये स्वयंसेवी संस्थांचा सहभाग**

संदर्भ : १. जनआरोग्य संसद कार्यकर्ते यांच्यासमवेत दिनांक ८/२/२००१ रोजीची चर्चा

२. सआसे/निविमु/आरोग्य संस्था/सूचना फलक/कक्ष-७,
दिनांक : ७/१२/२०००

प्रिय डॉ.

संदर्भिय क्र. २ च्या पत्रान्वये आपणांस आरोग्य संस्थांमध्ये सूचनाफलक लावण्याबाबत सूचित करण्यात आलेले होते व मला आशा आहे की, आपण या सूचनांचे काटेकोरपणे पालन केलेले असणार. तथापि, अद्यापी या सूचनांचे पालन केलेले नसल्यास,आपणांस पुन्हा एकदा सूचित करण्यात येते की, संदर्भीय सूचनांचे काटेकोरपणे त्वरित पालन करण्यात यावे व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल महासचांलनालयास सादर करण्यात यावा.

दिनांक ८/२/२००१ रोजी जन आरोग्य संसद कार्यकर्त्यांशी माझी आरोग्याशी निगडीत कार्यक्रम राबविण्यामध्ये स्वयंसेवी संस्थांच्या सहभागाबाबत सखोल चर्चा झाली. आपणांस विदितच आहे की, आरोग्य सेवांचे कार्यक्रम व्यवस्थित राबविण्याकरिता आणि सार्वजनिक आरोग्य व्यवस्था बळकट व लोकाभिमुख होण्याच्या दृष्टीने स्वयंसेवी संस्थांच्या सहभागाला अनन्य साधारण महत्व आहे. या अनुषंगाने आपणांस खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

१. आपल्या जिल्ह्यातील आरोग्य सेवांशी निगडित नोंदणीकृत स्वयंसेवी संस्था अथवा नोंदणीकृत स्वयंसेवी संस्थांशी संलग्न अशा संस्थांची यादी तयार करावी.

२. नोंदणीकृत संस्थांची यादी तयार केल्यानंतर अशा संस्थांशी संवाद वाढवून त्यांचा आरोग्य सेवेमध्ये कशाप्रकारे सहभाग घेता येईल याचा कृती कार्यक्रम तयार करावा.

३. एखादी स्वयंसेवी संस्था स्वतःहून आरोग्य विषयक कार्यक्रम हाती घेत असल्यास, सदर संस्थेला सर्व ते सहकार्य व आरोग्य विषयक सेवांबाबतची माहिती प्राधान्याने देण्यात यावी.

आरोग्य विषयक कार्यक्रम क्षेत्रामध्ये व्यवस्थित राबविण्याच्या दृष्टिकोनातून आपणांस खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

१. स्त्री आरोग्य कर्मचारी यांच्या गावभेटीचा कार्यक्रम ग्रामपंचायतीमध्ये उपलब्ध असावा, भेटीचा कार्यक्रम स्त्री आरोग्य कर्मचा-यांनी नियमित पाळला जाईल याकडे लक्ष द्यावे.

२. स्त्री आरोग्य कर्मचा-यांनी मुख्यालयाच्या ठिकाणी आठवडयातून किमान एक दिवस रूग्ण चिकित्सा दिवस आयोजित केलेला असावा.

३. एम.सी.पी. सत्रे नियमित होतील याकडे लक्ष द्यावे.

४. स्त्री आरोग्य कर्मचा-यांनी घरभेटीच्या वेळी काही आरोग्य विषयक बाबी आढळून आल्यास उदा. गरोदर स्त्री तपासणी, थंडी तापाच्या रूग्णांचे रक्तनमुने इत्यादी तर अशा बाबती घरभेटीच्या दरम्यानच पार पाडाव्यात.

५. वैद्यकीय अधिकारी यांनी उपकेंद्राला ठरावीक दिवशी व वेळी नियमीत भेटी देऊन रूग्ण तपासावेत व इतर आरोग्य विषयक कामांची तपासणी करावी.

आपणांस सूचित करण्यात येते की, वरील सर्व बाबी वैद्यकीय अधिकारी यांच्या सभेमध्ये निदर्शनास आणून सदर सूचना सर्व क्षेत्रीय कर्मचारी यांच्यापर्यंत पोहचतील व प्रत्यक्ष कृतीत आणल्या जातील याकडे लक्ष पुरवावे. स्वयंसेवी संस्थांचा सहभाग व गावपातळीवर आरोग्य कार्यक्रम राबविण्याच्या दृष्टीने आपण केलेली कृती महासंचालनालयास सादर करावी

शुभेच्छांसह,
आपला स्नेहांकित
(सुभाष साळुंखे)

प्रति- जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, (सर्व)
प्रति- जिल्हा शल्य चिकित्सक सामान्य रूग्णालय(सर्व)
प्रत माहितीसाठी : उपसंचालक आरोग्य सेवा परिमंडळे (सर्व)

आपणांस सूचित करण्यात येते की, विभागीय सभेच्या वेळी या सर्व गोष्टींचा आढावा घेण्यात यावा.

प्रत : जन आरोग्य संसद - २००० भारत ज्ञान विज्ञान समुदाय, भगतसिंह सभागृह,
२१६, नारायण पेठ , केळकर रोड, पुणे - ३० यांना माहितीस्तव

साथी केंद्र, सेहत

आरोग्य सेवा, विशेषतः प्राथमिक आरोग्य सेवा हा जनतेचा हक्क मानला जावा यासाठी आरोग्य चळवळीत इतर समविचारी संस्था-संघटनांच्या सोबत योगदान देण्याचे काम साथी केंद्र करते. साथी-केंद्राचा पाया आरोग्य-साथी प्रकल्पामध्ये (१९९८-२००१) घातला गेला. गेल्या पाच-सहा वर्षात या कामाचा खालील ढाचा तयार झाला आहे.

- दूरवरच्या खेड्यापाड्यांमध्ये साध्या, नेहमीच्या आजारांवर सुरूवातीचा उपचार देण्याची व्यवस्था जनसंघटना किंवा जनवादी संस्थांच्या सोबत उभारायची. त्यासाठी पाड्यातील लोकांनी निवडलेल्या स्त्रियांना आरोग्य साथी म्हणून प्रशिक्षण द्यायचे. आरोग्य साथींनी दिलेल्या या प्राथमिक उपचारांमुळे या दूरवरच्या ग्रामीण, आदिवासी कष्टकऱ्यांचे दरवर्षी लाखों रूपये वाचले आहेत. वेळेवर व पाड्यातच उपचार मिळाल्यामुळे होणारी सोय, टळणाऱ्या गुंतागुंती, लोकांना त्यांच्याच बोलीभाषेत मिळणारी माहिती असे फायदेही कमी महत्त्वाचे नाहीत.

- आदिवासी जिल्ह्यांसाठीच्या महाराष्ट्र सरकारच्या नवसंजीवनी योजनेतील काही महिला पाडा-स्वयंसेवकांना डहाणू भागात प्रशिक्षण देण्याच्या प्रयोगातून एका वर्षातच हजारो आजाऱ्यांवर उपचार. या कार्यक्रमाच्या निमित्ताने बनवलेल्या आरोग्य साथींसाठीच्या 'ग्रामीण आरोग्य कार्यकर्ता प्रशिक्षण' या अभ्यासक्रमाला मुंबईच्या एस.एन.डी.टी. विद्यापीठाची मान्यता मिळाली आहे.)

- इंजेक्शन, सलाईन यांचा दुरूपयोग, रक्तपांढरी, स्त्रियांचे खास आरोग्य प्रश्न, आपल्या शरीरातील निरनिराळे अवयव; आरोग्य सेवेचा हक्क इत्यादी प्रश्नांबाबत ग्रामीण आरोग्य कार्यकर्त्यांमार्फत आरोग्य-जागृतीचे काम.

- प्राथमिक आरोग्य केंद्रे व ग्रामीण रूग्णालये यांच्यामार्फत मिळणाऱ्या सेवांमध्ये सुधारणा व्हावी यासाठी 'आरोग्य संवाद' असे परस्पर चर्चेच्या कार्यक्रमापासून ते मोर्चा, धरणे असे कार्यक्रम स्थानिक संघटनांनी 'सेहत' च्या सहकार्याने घेणे व या सुधारणा घडवून आणणे.

- महाराष्ट्रातील समविचारी संस्था-संघटनांच्या कार्यकर्त्यांच्या प्रशिक्षणासाठी, व त्यांनी घेतलेल्या इतर कार्यक्रमांसाठी योगदान, सल्ला देणे.

- 'जन आरोग्य अभियान' हे आरोग्य चळवळीचे व्यापक व्यासपीठ उभे राहिले आहे. सार्वजनिक आरोग्य सेवांमध्ये सुधारणा व काही महत्त्वाच्या आरोग्य-प्रश्नांबाबत जन जागृती यासाठी जन आरोग्य अभियान काम करते. आरोग्य सेवा हा मानवी अधिकार आहे या भूमिकेतून चालवल्या जाणाऱ्या या अभियानात पुढाकार घेणाऱ्यांपैकी 'साथी केंद्र' चा संच आहे. सार्वजनिक आरोग्य सेवांच्या खराब स्थितीकडे लक्ष वेधणाऱ्या 'जन सुनवाया' या अभियानामार्फत आयोजित करण्यात आल्या आहेत. त्यातही एक आघाडीचा संच म्हणून साथी-केंद्राने काम केले आहे.

- हे सर्व काम करण्यासाठी चांगल्या दर्जाचे, सुयोग्य असे चित्ररूप प्रशिक्षण साहित्य व आरोग्य जागृतीसाठी साहित्य (पुस्तिका, पुस्तके, प्रदर्शने, पोस्टर्स, स्लाईड शो इ.) बनवणे.

या सर्व कामाच्या आधारे साथी-केंद्राने महाराष्ट्रात व देशातही संबंधितांचा विश्वास कमावला आहे.

सेहत बद्दल.....

सेहत CEHAT (Centre for Enquiry into Health and Allied Themes) हे अनुसंधान ट्रस्टचे संशोधन केंद्र आहे. आरोग्य विषयक लोकाभिमुख संशोधन व सामाजिक कार्य करण्यासाठी १९९१ साली सेहतची स्थापना झाली. आरोग्य व आरोग्य सेवा हा जनतेचा हक्क आहे हा समज समांजात घट्ट व्हावा या दिशेने सेहतचे संशोधन व इतर सामाजिक कार्य चालते. सेहतने १९९४ पासून सामाजिक आरोग्याच्या दृष्टी महत्वाच्या खालील चार पैलुंवर पंचेचाळीस पेक्षा जास्त प्रकल्प हाती घेतले आहेत-

१. आरोग्य-सेवा व त्याचे अर्थकारण,

२. आरोग्य विषयक कायदे व नैतिकता, प्राथमिक आरोग्य सेवा

३. स्त्रियांचे खास आरोग्य प्रश्न

४. हिंसा, आरोग्य, मानवी हक्क

निव्वळ संशोधनावर समाधान न मानता आरोग्य क्षेत्रातील सत्ता-संतुलन जनतेच्या बाजूने झुकावे यासाठी गाव किंवा वस्तीपातळीवर आरोग्य कार्यकर्ता तयार करणे, परिणामकारक सेवेसाठी सरकारी व खाजगी आरोग्यक्षेत्रावर दबाव निर्माण करणे, खाजगी क्षेत्राच्या नियंत्रणासाठी पाऊले उचलणे, लोकांमध्ये त्यांच्या हक्कांसाठी जाणीव जागृती निर्माण करणे आणि एकंदरितच दुर्बल घटकांचा आवाज सक्षम करणे यासाठीही सेहत कार्यरत आहे. स्त्रियांचे काही दुर्लक्षित प्रश्न- गर्भपात, घरात होणाऱ्या हिंसेमुळे आरोग्यावर होणारा दुष्परिणाम, स्त्रीलिंगी गर्भपात या प्रश्नांवरही संशोधन, व जनमताचा दबाव निर्माण करण्याचे कामही सेहत करत आहे.

संशोधन व सामाजिक उपक्रमांची संख्या, त्यांचे विषय व कामाचा दर्जा यामुळे सेहतने थोड्याच काळात भारतातील या क्षेत्रातील एक अग्रगण्य संस्था असे नाव कमावले आहे. सेहत आपल्या घोषित उद्दिष्टांनुसार काम करत आहे ना हे पाहण्यासाठी एक स्वतंत्र समिती स्थापन केली गेली असून सेहतची सर्व कागदपत्रे या समितीला उपलब्ध असतात. या समितीचा अहवाल प्रसिध्द करण्याचे बंधन सेहतने स्वतःवर घातले आहे, पाळले आहे. हे बंधन व एकूणच लोकशाही निर्णय प्रक्रिया, पारदर्शकता, व संशोधन प्रकल्पांमध्ये नैतिक तत्वे पाळण्याचा आग्रह यामुळेही सेहत नावारुपाला आली आहे.

आरोग्य-सेवेमध्ये सुधारणा करण्यासाठी 'आरोग्य संवाद' ही एक तशी नवीन पध्दत गेल्या काही वर्षांमध्ये आकारली आहे. तिची ओळख करुन देणारी ही पुस्तिका.

आरोग्य - सेवा देणारे डॉक्टर्स, इतर आरोग्य-सेवक खाजगी डॉक्टर्स, त्यांच्या संघटना यांच्याशी चांगल्या आरोग्य-सेवांसाठी संघटितपणे जनतेने संवाद करणे म्हणजे आरोग्य-संवाद. या आरोग्य-संवादाबद्दल खालील मुद्यांचे थोडक्यात विवरण या पुस्तिकेत केले आहे-

- गावात, वस्तीमध्ये बैठका घेऊन आरोग्य- संवादासाठी तयारी कशी करायची?
- गावामध्ये, उपकेंद्र, प्राथमिक आरोग्य-केंद्र, ग्रामीण रुग्णालय यामध्ये कोणत्या सेवा देण्याचे सरकारचे धोरण आहे? या सेवा प्रत्यक्षात मिळतात का नाही याची पाहणी कशी करता येईल?
- या आधारे डॉक्टर्स व इतर आरोग्य-सेवकांशी कसा संवाद करता येईल?
- या आरोग्य संवादाचा पाठपुरावा कसा करावा?
- सरकारी सेवांची स्थिती व लोकांना मिळणाऱ्या सेवांचा दर्जा याबाबत 'जनसुनवाई' हा कार्यक्रम का व कसा आयोजित करायचा?
- खाजगी डॉक्टरांशी आरोग्य संवाद कसा, कोणत्या मुद्यांवर करता येईल?

जन आरोग्य अभियानाला प्रतिसाद म्हणून महाराष्ट्र सरकारने काढलेली दोन परिपत्रके, आरोग्य-संवादासाठी उपयोगी दोन पोस्टर्स असे परिशिष्ट व वरील मुद्यांबाबतचे मार्गदर्शन असलेली ही पुस्तिका महाराष्ट्रातील आरोग्य-कार्यकर्त्यांना, संस्थांना-संघटनांना नक्की उपयोगी वाटेल व वापरली जाईल.

सेहत प्रकाशन

देणगी मूल्य - रु.३०